# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १०.०९.२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री.राजेंद्र गणेशराव बोंडे, वय ५७ वर्षे, पद : विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय, व्यंकय्यापुरा, अमरावती, वर्ग — १ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १०.०९.२०२० चे ०९.०० वा. ते १०.३० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | एकुण ५,००,०००/— रुपये |
| ५ | सापळा कारवाई दरम्यान स्विकारलेली लाच रक्कम | पहिला टप्पा २,५०,०००/— रुपये |
| ६ | घटनास्थळ | आलोसे राहते घरी, व्हिनस पार्क, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांचे सामाजिक वनीकरण कार्यालय, अमरावती येथील वरिष्ठ अधिकारी श्री.राजेंद्र बोंडे, विभागीय वनअधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांचेकडे दिलेल्या सामाजिक वनीकरण, वरुड जि.अमरावती चे अतिरीक्त कार्यभारांचा मोबदला म्हणुन ५,००,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक : १६.०७.२०२० रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दिनांक : १६.०७.२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यावाही दरम्यान आलोसे श्री.राजेंद्र बोंडे, विभागीय वनअधिकारी यांची तक्रारदार यांना सामाजिक वनीकरण, वरुड जि. अमरावती येथील अतिरीक्त कार्यभार दिल्याचा मोबदला म्हणुन ५,००,०००/— रुपये लाचेची मागणी असल्याचे व मागणी केलेली लाच रक्कम तक्रारदार यांचेकडून दोन टप्प्यामध्ये स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक : १०.०९.२०२० रोजी करण्यात आलेल्या कार्यवाही दरम्यान आलोसे श्री. राजेंद्र बोंडे, विभागीय वनअधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडून मागणी केलेल्या लाच रक्कम ५,००,०००/— रुपये पैकी पहिला टप्पा २,५०,०००/— स्विकारण्याचे मान्य करुन त्यांचे राहते घरी सदरची लाच रक्कम स्विकारतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती श्री.पंजाबराव डोंगरदिवे यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, पो.हवा.चंद्रशेखर दहेकर, पो.हवा.माधुरी साबळे, पो.ना.सुनिल व—हाडे, पो.कॉ.अभय वाघ, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर —१०६४

पोलीस उप-अधिक्षक ... ब्युरो अमरावती

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

Scanned with CamScanner